**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी गेल्यावेळेपेक्षा कमी मतदान, सुमारे ५८ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ६७ टक्क्यांहून अधिक मतदान; पंजाब, केरळ, उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये पोटनिवडणुकीसाठी मतदान

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं गयानात औपचारिक स्वागत

- ५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून गोव्यात

**आणि**

- चीनला १-० ने नमवून आशियाई हॉकीचं अजिंक्यपद भारतीय महिला संघाला

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज काही अपवाद वगळता सुरळीत मतदान झालं. निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या हंगामी आकडेवारीनुसार राज्यात ५८ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली होती. सर्वाधिक ६९ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद गडचिरोली जिल्ह्यात झाली. सर्वात कमी ५० टक्क्यांहून कमी मतदानाची नोंद मुंबई शहर आणि ठाणे जिल्ह्यात झाली. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी सुमारे ५४ टक्के मतदानाची नोंद झाली.

सर्वाधिक सुमारे ७५ टक्के मतदान चिमूर विधानसभा मतदार संघात झालं. कागल, करवीर, ब्रह्मपुरी, शाहुवाडी, सिल्लोड, नेवासा या मतदारसंघात ७० टक्क्यांहून अधिक मतदान झालं. सर्वात कमी मतदानाची नोंद कल्याण पश्चिम

आणि कुलाबा मतदारसंघात झाली. इथं केवळ ४१ टक्के मतदान झालं. चांदिवली, पिंपरी, उल्हासनगर, भिवंडी, धारावी, हडपसर, जळगाव या मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालं. आता शनिवारी २३ तारखेला मतदारांनी कोणाला कौल दिला हे स्पष्ट होईल.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यात गेल्यावेळेपेक्षा कमी मतदान नोंदवलं गेलं. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी आज महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी शांततेत मतदान झालं तरी मर्यादित ठिकाणी गैरप्रकार झाले. निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर प्रशासन आणि पोलिसांनी कारवाई केली.

**नाशिक** जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना आज सकाळी जीवे मारण्याची धमकी दिली. कांदे यांनी मतदारांना एका बसमध्ये बसवून मतदान केंद्रावर आणल्याबद्दल भुजबळ यांनी आक्षेप घेतल्यानंतर हा वाद झाला.

**मुंबईत**ल्या दिंडोशी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाली.

**बीड** जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघातल्या घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव या गावांमध्ये मतदान केंद्रावर मतदान यंत्रांची तोडफोड झाली, याबद्दल

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसने परस्परांवर आरोप केले आहेत.

**बारामती**तल्या एका मतदान केंद्रावर दमदाटी करून बोगस मतदान केलं जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हे आरोप फेटाळून लावले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात एकूण ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त झाली आहे. सर्वाधिक १४२ कोटी रुपयांची मालमत्ता मुंबई उपनगर जिल्ह्यात जप्त झाली. . यात २८४ कोटी रुपये किमतीचे मौल्यवान धातू, १६० कोटी रुपये रोख, १११ कोटींचा इतर मुद्देमाल, ७५ कोटी रुपये किमतीचं मद्यं आणि ७३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ आहेत. आचारसंहिता भंगाच्या १० हजार १३९ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी १० हजार १३४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

**<><><><><>**

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं निवडणुकीसाठी बिटकॉईनच्या माध्यमातून पैसे वाटल्याचा आरोप भाजपानं केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा यात हात असल्याचा आरोप भाजपा प्रवक्ते सांबित पात्रा यांनी

आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत केला. या बिटकॉईन घोटाळ्याची रक्कम २३५ कोटी रुपयेपर्यंत असल्याचा अंदाज आहे, असं पात्रा म्हणाले.

बिटकॉईन प्रकरणात भाजपा आपल्यावर खोटे आरोप करत असून हे भाजपाचं कारस्थान जनता उधळून लावेल, अशी प्रतिक्रिया प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज दिली. सुप्रिया सुळे यांनीही हे आरोप फेटाळले आहेत. दरम्यान, या प्रकरणातला सायबर तज्ञ गौरव मेहता याच्या छत्तीसगढमधल्या घरावर ईडीनं छापा टाकला.

**<><><><><>**

**मतदान प्रक्रिया** सुरू असताना अनेक ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाला. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….

***होल्ड व्हाइस कास्ट***

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात शांततेत मतदान झालं. यावेळी संपूर्ण राज्यात कडेकोट बंदोबस्त होता. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ६७ पूर्णांक ५९ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. दुर्गम भागातली आकडेवारी मिळाल्यावर ही टक्केवारी वाढेल, असं अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. या दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांत ३८ मतदारसंघात मतदान झालं. दुसऱ्या टप्प्यात ५२८ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रामध्ये बंदिस्त झालं असून त्यात ५५ महिला उमेदवार आहेत. येत्या शनिवारी मतमोजणी होईल.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन, विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ महतो, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी, विरोधीपक्ष नेते अमर कुमार बाउरी, ऑल झारखंड

स्टुडंट युनियनचे अध्यक्ष सुदेश कुमार महतो आणि कल्पना सोरेन या मातब्बर उमेदवारांचं भवितव्य मतपेट्यांमध्ये बंद झालं आहे.

**<><><><><>**

केरळ, उत्तराखंड, पंजाब आणि उत्तर प्रदेश राज्यांतही विधानसभा पोटनिवडणुकांसाठी आज शांततेत मतदान झालं. केरळमध्ये पल्लकड इथं ६२ पूर्णांक २५ शतांश टक्के, उत्तराखंडमध्ये केदारनाथ इथं ५६ पूर्णांक ७८ शतांश टक्के, पंजाबमधल्या चार तर उत्तर प्रदेशातल्या नऊ मतदार संघातही मतदानाची चांगली टक्केवारी नोंदवण्यात आली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी गयानात पोहोचले. यावेळी प्रधानमंत्र्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं आणि त्यांना मानवंदना देण्यात आली. प्रधानमंत्री आज जॉर्जटाऊन इथं गयानाचे राष्ट्रपती मोहमद्द इरफान अली यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. यावेळी अनेक सामंजस्य करारावर स्वाक्षर्या होण्याची शक्यता आहे. तसंच ते आज कॅरिकोम-भारत शिखर परिषदेत सहभागी होणार असून कॅरिकोम सदस्य देशांच्या नेत्यांसोबत बैठक घेणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गयानाच्या संसदेला संबोधित करतील. तसंच ते गयानातल्या भारतीय समुदायाशी संवाद साधतील. आरोग्य, कनेक्टिव्हिटी, अक्षय ऊर्जा आणि पाणी या क्षेत्रात भारताची गयानासोबत दीर्घकालीन भागीदारी आहे.

**<><><><><>**

५५व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आज गोव्यात सुरुवात झाली. तत्पूर्वी सकाळी इफ्फीच्या फिल्म बाजार या सत्राचं उद्घाटन

माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू आणि प्रसिद्ध दिग्दर्शक शेखर कपूर यांच्या हस्ते झालं. या सोहळ्यासाठी चित्रपटसृष्टीतल्या अनेक कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांनी हजेरी लावली आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि चिनी संरक्षणमंत्री डोन्ग जून यांची आज लाओस मध्ये द्विपक्षीय बैठक झाली. आसियान संरक्षणमंत्र्यांची बैठक तिथे भरली असून राजनाथ सिंह यांचा हा दौरा तीन दिवसांचा आहे. क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांबाबत देखील राजनाथ सिंह आपली मतं मांडणार आहेत. ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम हे आसियान देश आणि भारत, अमेरिका, चीन, रशिया, जपान, दक्षिण कोरिया या देशांमधल्या चर्चेसाठी व्यासपीठ म्हणून या बैठकीकडे पाहिलं जातं. या देशांबरोबरचं सैन्य सहकार्य वाढवणं हा या भेटीमागचा उद्देश असतो.

**<><><><><>**

प्रधानमंत्री गतिशक्तिच्या नेटवर्क प्लांनिंग समूहाने एकूण १५ लाख ८९ हजार कोटी रुपयांच्या २२८ पायाभूत प्रकल्पांचं मूल्यमापन केलं. प्रधानमंत्र्यांनी २ हजार २१ मध्ये या योजनेची सुरुवात केली होती. दळणवळण विषयक आखणी करताना त्यात परस्पर अनुरूपता आणि सहक्रिया निर्माण व्हावी या हेतूनं या योजनेची सुरुवात करण्यात आली होती. उद्योग आणि अंतर्गत व्यापार वृद्धी विभागाचे अतिरिक्त सचिव राजीव सिंग ठाकूर यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली.

**<><><><><>**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी चार दिवसांच्या नेपाळ भेटीवर आज रवाना झाले. दोन्ही देशांच्या लष्करांमधलं सैन्य सहकार्य वाढवणं तसंच सहयोगाचे नवे मार्ग शोधणं हा या भेटीचा उद्देश आहे. या भेटीत लष्करप्रमुखांना नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांच्या हस्ते नेपाळी लष्कराची मानद जनरल रँक प्रदान केली जाणार आहे. लष्करप्रमुख आपल्या दौऱ्यात नेपाळचे प्रधानमंत्री के पी शर्मा ओली आणि संरक्षण मंत्री मनबीर राय यांची भेट घेऊन परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. तसंच ते नेपाळी लष्करातले त्यांचे समकक्ष अधिकारी जनरल अशोक राज सिगडेल यांची अनौपचारिक भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

हवाई हल्ला होण्याच्या शक्यतेवरून युक्रेनची राजधानी कीव इथला अमेरिकी दूतावास बंद करण्यात आला आहे. दूतावासावर हल्ला होण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्यावरून तो बंद करण्यात आला असून असा हल्ला झालाच तर अमेरिकन नागरिकांनी तात्काळ सुरक्षित स्थळी जाण्याची सिद्धता ठेवावी, अशी माहिती अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केली आहे. हवाई हल्ल्याची जाणीव करून देणारे भोंगे जय्यत तयार ठेवण्यात आले असून ग्रीस आणि स्पेनचे दूतावास देखील बंद करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

पाकिस्तानाच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातल्या बन्नू जिल्ह्यातल्या मालीखेल इथं सुरक्षा चौकीवर आज झालेल्या आत्मघाती हल्ल्यात १२ जवान ठार झाले तर १० गंभीर जखमी झाले. खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तान प्रांतात सुरक्षा चौक्यांवरील घटनांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी बलुचिस्तान इथल्या एका चौकीवर झालेल्या हल्ल्यात सात सैनिक मारले गेल होते.

**<><><><><>**

बिहारच्या राजगीर इथं आज झालेल्या महिलांच्या आशियाई चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघानं विजेतेपद पटकावलं.

भारतीय संघाने चीनचा १ -० असा पराभव केला. सामन्याचं मध्यांतर होईपर्यंत दोन्ही संघांना एकही गोल करता आला नव्हता. मध्यंतरानंतर भारताच्या दीपिकाने गोल करत खातं उघडलं आणि तोच भारतासाठी निर्णायक गोल ठरला.

**<><><><><>**

अमेरिकेत नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेहमेट ओझ यांची मेडिकेड आणि मेडिकेअर सेवांचे प्रमुख म्हणून नियुक्त केलं आहे. ओझ हे चिकित्सक आहेत. आरोग्य आणि मानव सेवा प्रशासनाचे प्रमुख रॉबर्ट एफ. केनेडी ज्युनियर यांच्यासोबत डॉ. ओझ काम करतील, असंही ट्रम्प यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**